Regisuation No. MAH/ 222 /2023
Date 18/10/2023 Under

Assistant Registrar of Societies

अर्ज क्रमांक ....886/2023....
...चे नाव ....
...अर्ज आला तो दि. ....12/05/2023....
...तारीख दिनांक ....07/06/2023....
...दिली तो दि. ....07/06/2023....

निरीक्षक 07 JUN 2023
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग,अकोला

## परिशिष्ट "ब"

श्रीमती पंचफुलादेवी पाटिल समाजकार्य महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ,खडकी,ता.जि.अकोला.

या संस्थेचे

## मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन

०१. संस्थेचे नांव :– **श्रीमती पंचफुलादेवी पाटिल समाजकार्य महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ,खडकी,ता.जि.अकोला.**

०२. कार्यालयाचा पत्ता : **व्दारा. श्री पी. जी. काळे खडकी,अकोला,ता.जि.अकोला.**

धर्मदाय उपआयुक्त
DEPUTY CHARITY COMMISSIONER
AKOLA REGION, AKOLA
सत्यमेव जयते
अकोला विभाग, अकोला

०३. संस्थेचे उद्देश :

१. श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालयातील माजी विद्यार्थी यांना एकत्रित करणे. त्यांचे संगठन करणे.

२. विविध खेळासंबंधी मार्गदर्शन करणे तसेच विद्यार्थ्यां करिता स्पर्धा परिक्षा संबंधी मार्गदर्शन करणे.

३. आदिवासी, ग्रामीण व शहरी भागातील रूग्णांना अत्याधुनिक रूग्णसेवा, आरोग्य सेवा देण्याच्या दृष्टीने फिरते रूग्णालय, हॉस्पीटल उघडणे.

४. जनतेमध्ये साक्षरतेचा प्रचार व प्रसार करणे. त्यासाठी प्रौढ शिक्षण वर्ग सुरु करणे व चालविणे श्रमिक मुलांना, मुलींना तसेच प्रौढांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी यासाठी रात्रशाळा सुरू करणे.

५. विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरिता नविन उपाय योजना करणे. व कॉलेज मध्ये विद्यार्थ्यांच्या विविध सुविधाबाबत पाहणी करणे.

६. संगीत,गायन, वादन, नृत्य व अभिनय या कलांचे शिक्षण देणारी विद्यालये व महाविद्यालये स्थापन करणे व चालविणे तसेच शैक्षणीक विकासासाठी आवश्यक माहीती पुरविणे. तसेच चित्रकला, सामान्य ज्ञान निंबध स्पर्धेचे आयोजन करणे.

७. शिक्षण घेणाऱ्या विशेषतः मागासवर्गिय मुलांसाठी व मुलींसाठी विद्यार्थि वस्तीगृह स्थापन करणे व चालविणे.

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil Social Work College, Khadki, AKOLA

अध्यक्ष

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social Work College, Khadki, Akola

उपाध्यक्ष

सचिव

८. युवा वर्गात व्यायाम, क्रिडा व खेळ यांची आवड निर्माण करण्याचा प्रयत्न करणे. व्यायाम शाळा, योगाभ्यास केंद्र, आखाडे, स्थापन करणे व चालविणे. विविध प्रकारचे व्यायाम, शारिरीक कसरती, क्रिडा व खेळ यांचे शिक्षण व प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे

सुशिक्षीत बेरोजगारांसाठी व्यवसाय मार्गदर्शन करणे व प्रशिक्षण देणे. तसेच ॲडव्हान्स डिप्लोमा इन कॉम्प्युटर प्रोग्रामींग इनफॉरमेशन टेक्नॉलॉजी सॉप्टवेअर टेक्नॉलॉजी इत्यादीचे मार्गदर्शन करणे व प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविणे.

सांस्कृतिक विकासाचे दृष्टीने साहित्य स्पर्धा, साहित्य संमेलन, विविध कला प्रशिक्षण, सांस्कृतिक स्पर्धा, शालेय विद्यार्थ्यांकरिता विविध स्पर्धांचे आयोजन करुन राबविणे.

११. महिला व बाल कल्यांणाच्या विविध योजना राबविणे. तसेच युंवकासाठी सांस्कृंतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

१२. माजी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सोयी सुविधा व आत्मनिर्भर प्रकल्प राबविणे.

१३. महाविद्यालयामध्ये विविध प्रकल्प राबविणे व माजी विद्यार्थ्यांना समाविष्ट करणे.

१४. संविधानिक मुल्यांचा प्रचार व प्रसार करणे.

१५. अनाथालय, वृध्दाश्रम, व युवकांबाबत विविध कार्यक्रम आयोजित करणे. अंध विद्यालय, अपंग विद्यालय, मतीमंद मुलांचे व मुलींचे विद्यालय स्थापन करणे व चालविणे.

१६. कला, वाणिज्य, विज्ञान, मेडिकल, डी.एम.एल.टी, टेक्नीकल, व्होकेशनल, डी. एड, बी.एड, आभियांत्रिकी, वैद्यकीय आर्युवैद प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे.

१७. महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टिने विकासात्मक तरतुदि करणे व पोषक वातावरण निर्माण करणे तसेच विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षा व रोजगार मार्गदर्शन करणे.

१८. जिवन मुल्यांच्या जोपासनेचे कार्य करणे.

१९. एम.पी.एस.सी., युपीएससी., आयआयटी, [illegible] पोलिस पूर्व भरती प्रशिक्षण कॉलेज, विद्यार्थी प्रशिक्षण योजना राबविणे. आ तफ) तो. तोटा स्वा (राबवीणे.

२०. [illegible], टाटा इन्स्टिटयूट जागतिक आरोग्य [illegible] इत्यादी प्रशिक्षण समाज उपयोगी योजना राबविणे.

२१. गरिब व होतकरू विद्यार्थ्यांकरिता शिक्षणवर्ग चालविणे. शासनाच्या पूर्व परवानगीने राबवीणे.

२२. युवा कल्याणाचे विविध प्रकल्प आयोजित करणे, समाजसेवा शिबीर आयोजित करणे. स्वयंरोजगार शिबीराचे आयोजन करणे, बेरोजगार युवक युवतीसाठी कार्यशाळा स्थापन करणे व चालविणे व जिल्हा आणि तालुका पातळीवर युवा महोत्सव आयोजित करणे.

अध्यक्ष

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social Work College, Khadki, Akola

उपाध्यक्ष

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil Social Work College,
Khadki, AKOLA

सचिव

Smt. P.D. Patil Social Work College, AKOLA, College Code 225

०४.

श्रीमती पंचफुलादेवी पाटिल समाजकार्य महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ, खडकी,ता.जि.अकोला. या संस्थेच्या नियम व नियमावली प्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेची व्यवस्था वा कारभार सोपविण्यात आलेला आहे. अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची नावे, पत्ते, हूद्दे, वय,व्यवसाय व राष्ट्रीयत्व खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सभासदाचे संपुर्ण नाव व पत्ता | हूद्दा | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | प्रा.डॉ. संकेत सुरेशराव काळे<br>खडकी बु. अकोला,ता.जि.अकोला. | अध्यक्ष | ३० | प्राध्यापक | भारतीय |
| ०२. | प्रा.डॉ. प्रफुल विनायक पवार<br>संतोष नगर,खडकी बु.अकोला,ता.जि.अकोला. | उपाध्यक्ष | ४० | प्राध्यापक | भारतीय |
| ०३. | प्रा.डॉ. केशव सिताराम गोरे<br>मु.सोनखास पो.तामसी,ता.जि.वाशिम | सचिव | ४८ | प्राध्यापक | भारतीय |
| ०४. | प्रा जयश्री पंजाबराव काळे<br>खडकी बु. अकोला,ता.जि.अकोला. | कोषाध्यक्ष | ३० | प्राध्यापक | भारतीय |
| ०५. | प्रा.डॉ. सुनिता तुकाराम राठोड<br>मु.सोनखास पो.तामसी,ता.जि.वाशिम | सदस्य | ४७ | प्राध्यापक | भारतीय |
| ०६. | प्रा.डॉ.केतन गौतम वाकोडे<br>मलकापुर,अकोला,ता.जि.अकोला. | सदस्य | ३५ | प्राध्यापक | भारतीय |
| ०७. | अतुल साहेबराव भांगे<br>खडकी बु. अकोला,ता.जि.अकोला. | सदस्य | २४ | शिक्षण | भारतीय |

अध्यक्ष

उपाध्यक्ष

सचिव

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social
Work College, Khadki, Akola

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil
Social Work College,
Khadki, AKOLA

Khadki, AKOLA ✿ Smt. P.D. Patil Social Work College ✿ College Code 225

०५. **श्रीमती पंचफुलादेवी पाटिल समाजकार्य महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ, खडकी, ता.जि.अकोला.** या संस्थेचे सभासद जाहीर करतो की, संस्था नोदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत असलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असुन वरील उद्देशाने आम्ही एकत्र येवुन **श्रीमती पंचफुलादेवी पाटिल समाजकार्य महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ, खडकी,ता.जि.अकोला.** ही संस्था आज दिनांक १०/०४/२०२१ रोजी स्थापन केली असुन ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन वर सहया केल्या आहेत.

| अ.क्र. | सभासदाचे संपुर्ण नाव व पत्ता | सहया |
|---|---|---|
| ०१. | प्रा.डॉ. संकेत सुरेशराव काळे<br>खडकी बु. अकोला,ता.जि.अकोला. | Skale |
| ०२. | प्रा.डॉ. प्रफुल विनायक पवार<br>संतोष नगर,खडकी बु,अकोला,ता.जि.अकोला. | Pavar |
| ०३. | प्रा.डॉ. केशव सिताराम गोरे<br>मु.सोनखास पो.तामसी,ता.जि.वाशिम | [signature] |
| ०४. | प्रा. जयश्री पंजाबराव काळे<br>खडकी बु. अकोला,ता.जि.अकोला. | J.P.Kale |
| ०५. | प्रा.डॉ. सुनिता तुकाराम राठोड<br>मु.सोनखास पो.तामसी,ता.जि.वाशिम | Sathod |
| ०६. | प्रा.डॉ.केतन गौतम वाकोडे<br>मलकापुर,अकोला,ता.जि.अकोला. | [signature] |
| ०७. | अतुल साहेबराव भांगे<br>खडकी बु. अकोला,ता.जि.अकोला. | Bhange |

स्थळ : अकोला.

दिनांक : १०/०४/२०२१

वरील सहया करणाऱ्या सर्व इसमांना मी ओळखतो.त्यानी माझ्या समक्ष या मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन वर सहया केल्या आहेत.

अरुण एन. सौदागर
ॲडव्होकेट
Mob. 99 21 13 50 03

सहाय्यक धर्मादाय उपआयुक्त
DEPUTY CHARITY COMMISSIONER
AKOLA

अधीक्षक 07-June-2023
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग, अकोला

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil
Social Work College,
Khadki, AKOLA

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social Work College, Khadki, Akola

Made by-
Read by- 02/06/2023
Treat by-

Registration No. MAH/ 222/2021
Date 18/10/2021 Under
Assistant Registrar of Societies

886/2023

# परिशिष्ट "क"

## श्रीमती पंचफुलादेवी पाटिल समाजकार्य महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ, खडकी,ता.जि.अकोला.

07 June 2023
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग,अकोला

## या संस्थेची नियम व नियमावली

०१). नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या :

१). संस्था: संस्था म्हणजे **श्रीमती पंचफुलादेवी पाटिल समाजकार्य महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ,खडकी,ता.जि.अकोला.** असे समजण्यात येईल.

२). समासद : सभासद म्हणजे या नियम व नियमावलीतील तरतुदीनुसार रितसर झालेले या संस्थेचे सभासद असे समजण्यात येईल.

३). कार्यकारी मंडळ : कार्यकारी मंडळ म्हणजे या नियम व नियमावलीतील तरतुदीनुसार रितसर निवडण्यात आलेले या संस्थेचे कार्यकारी मंडळ असे समजण्यात येईल.

४). अध्यक्ष : अध्यक्ष म्हणजे या नियम व नियमावलीतील तरतुदीनुसार रितसर निवडण्यात आलेल्या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष असे समजण्यात येईल.

५). उपाध्यक्ष : उपाध्यक्ष म्हणजे या नियम व नियमावलीतील तरतुदीनुसार रितसर निवडण्यात आलेल्या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा उपाध्यक्ष असे समजण्यात येईल.

६). सचिव : सचिव म्हणजे या नियम व नियमावलीतील तरतुदीनुसार रितसर निवडण्यात आलेला या सस्थेच्या कार्यकारी मंडळाचा सचिव असे समजण्यात येईल.

७). कार्यकारी सभासद : कार्यकारी सभासद म्हणजे या नियम व नियमावलीतील तरतुदीनुसार रितसर निवडण्यात आलेले या सस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद असे समजण्यात येईल व या संज्ञेत पदाधिकारी यांचा समावेश राहील.

८) कोषाध्यक्ष : कोषाध्यक्ष म्हणजे या नियम व नियमावलीतील तरतुदीनुसार रितसर निवडण्यात आलेले या सस्थेच्या कार्यकारी मंडळाचे कोषाध्यक्ष समजण्यात येईल.

अध्यक्ष    उपाध्यक्ष    सचिव

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social Work College, Khadki, Akola

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil Social Work College,
Khadki, AKOLA

Smt. P.D. Patil Social Work College, Khadki, AKOLA — College Code 225

०२).संस्थेचे कार्यक्षेत्र :

या संस्थेचे कार्यक्षेत्र भारत देशा पुरते मर्यादित राहील.

०३). सभासदत्व व त्याची नोंदणीची पध्दत :

अ). या संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहणारा व्यक्ती ज्याचे वय १८ वर्षापेक्षा कमी नाही व ज्याला या संस्थेचे ध्येय, उद्देश आणि ही नियम व नियमावली मान्य आहे, या संस्थेची सभासद होण्यास पात्र अशी व्यक्ती समजण्यात येईल.

ब). या संस्थेची सभासद होउ इच्छिणाऱ्या व्यक्तीने सभासदत्व मिळण्यासाठी अध्यक्ष यांना उद्देशुन लेखी अर्ज केला पाहीजे. अशा अर्जासोबत या नियम व नियमावलीत यापुढे निर्धारित करण्यात आलेली सभासद शुल्काची रक्कम अग्रीम म्हणून जमा केली पाहीजे. सभासदत्वासाठी प्राप्त होणारे अर्ज कार्यकारी मंडळाच्या सभेत निर्णयासाठी ठेवण्यात येतील. कार्यकारी मंडळाच्या एकुण कार्यकारी सभासद संख्येच्या २/३ (दोन तृतियांश) इतक्या कार्यकारी सभासदांच्या संमतीने सभासदत्व प्रदान करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या एकुण कार्यकारी सभासद संख्येच्या २/३ (दोन तृतियांश) इतक्या कार्यकारी सभासदांनी सभासदत्व प्रदान करण्यास संमती दिल्यास तिच्या नांवाची नोंद "सभासद नोंदणी पुस्तकांत" करण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या एकुण कार्यकारी सभासद संख्येच्या २/३ (दोन तृतियांश) इतक्या कार्यकारी सभासदांनी संमती नदिल्यास सभासदत्व नाकारण्यात आले असे समजण्यात येईल. व अर्जा सोबत जमा केलेली सभासद शुल्काची अग्रीम रक्कम संबंधीतास परत करण्यात येईल. याबाबत कार्यकारी मंडळाने घेतलेला निर्णय अंतिम व निर्णायक राहील. सभासदत्व प्रदान न करण्याची कारणे कळविण्याचे कोणतेही बंधन कार्यकारी मंडळावर राहणार नाही.

०४).सभासदांचे प्रकार :

अ). **संस्थापक सभासद :**

या संस्थेच्या मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन वर सहया करणाऱ्या सर्व व्यक्तीना संस्थापक सभासद समजण्यात येईल.संस्थापक सभासद शुल्क १०१ रू राहील.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social Work College, Khadki, Akola

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil Social Work College, Khadki, AKOLA

Smt. P.D. Patil Social Work College (Khadki) AKOLA College Code 225

ब). **आजिव सभासद :**

आजिव सभासदत्वासाठी सभासद शुल्क रू. ५०१ (अक्षरी रूपये पाचशे एक फक्त) राहील. सभासद शुल्क रू. ५०१ (अक्षरी रूपये पाचशे एक फक्त) एकमुस्त देणाऱ्या व कार्यकारी मंडळाने रितसर सभासदत्व प्रदान केलेल्या व्यक्तीना आजिव सभासद समजण्यात येईल. आजीव सभासदांचे सभासदत्व आजिवन राहील.

क). **साधारण सभासद :**

साधारण सभासदत्वासाठी सभासद शुल्क रू. १०१ (अक्षरी रूपये एकशे एक फक्त) राहील. सभासद शुल्क १०१ (अक्षरी रूपये एकशे एक फक्त) एकमुस्त जमा करण्याऱ्या व कार्यकारी मंडळाने रितसर सभासदत्व प्रदान केलेल्या व्यक्तींना साधारण सभासद समजण्यात येईल.

०५). **सभासदत्व रद्द होणे किंवा करणे :**

१.) सभासद मरण पावल्यास अथवा सभासदाने सभासदत्वाचा राजिनामा दिला असल्यास व तो राजीनामा कार्यकारी मंडळाने रितसर मान्य केला असल्यास अथवा सभासद संस्थेच्या कार्यक्षेत्रा बाहेर कायम वास्तव्यासाठी गेल्यास, अशा सभासदाचे सभासदत्व आपोआप संपुष्टात येईल.

२.) संस्थेच्या कोणत्याही सभासदास (१) नैतिक अधःपाताचा अंतर्भाव होणाऱ्या कोणत्याही अपराधा बाबत फौजदारी न्यायालयात दोषी ठरविण्यात आले असल्यास,(२) सक्षम न्यायालयाने त्यास नादार घोषीत केले असल्यास व ती अमुक्त नादार असल्यास, (३) सक्षम न्यायालयाने वेडा घोषीत केल्यास अशा सभासदाचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

३.) संस्थेच्या ध्येय व उद्देश याविरूध्द कार्य करणाऱ्या व/किंवा संस्थेच्या हितास नुकसान पोहचले असे अकारण वर्तन करण्याया सभासदाचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. परंतु असा निर्णय घेण्यापुर्वी संबंधीत सभासदास त्यांची बाजु मांडण्याची व स्वतः च्या बचाव करण्याची योग्य संधी दिली पाहिजे.

४.) उपरोक्त नियम कमांक ५(२) व ५(३) नुसार सभासदाचे सभासदत्व रद्द करण्याचा निर्णय कार्यकारी मंडळाच्या एकुण कार्यकारी सभासद संख्येच्या २/३ (दोन तृतियांश) इतक्या कार्यकारी सभासदांच्या संमतीने घेण्यात येईल.

अध्यक्ष

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social Work College, Khadki, Akola

उपाध्यक्ष

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil Social Work College, Khadki, AKOLA

सचिव

Smt. P.D. Patil Social Work College Khadki, AKOLA College Code 225

०६) सर्वसाधारण सभा तिचे अधिकार व कार्य :

अ) प्रत्येक वर्षातुन एकदा वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात येईल. सर्वसाधारण सभेत सर्व सभासदांना हजर राहण्याचा व सभेच्या कामकाजात भाग घेण्याचा हक्क राहील.प्रत्येक सभासदास एक मत देण्याचा हक्क राहील.

ब) कार्यकारी मंडळाने सादर केलेल्या वार्षिक अहवालावर विचार विणीमय करणे व त्यास मान्यता देणे, संस्थेच्या कार्याबावत व कामाकाजाच्या पध्दतीबाबत निर्णय घेणे,संस्थेच्या हिशोबास मान्यता देणे, दर पाच वर्षानी कार्यकारी सभासदांची निवड करणे आणि या नियम व नियमावलीतील तरतुदींत बदल करणे ही सर्वसाधारण सभेची कार्ये व अधिकार राहीतील.

०७).सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या :

अ). सर्वसाधारण सभेची सुचना सभेच्या नियोजित तारखेच्या कमीत कमी दहा दिवस अगोदर मिळेलअशा बेताने प्रत्येक सभासदास अध्यक्ष यांच्या सहीने सुचना पुस्तकांतुन किंवा डाक पुस्तकांतुन देण्यात येईल किंवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यात येईल.

ब). सर्वसाधारण सभेत संस्थेच्या एकुण सभासद संख्येच्या २/३ (दोन तृतियांश) इतक्या सभासदांची उपस्थिती गणपुर्तीसाठी आवश्यक राहील. सभेच्या नियोजित वेळेपासुन अर्ध्या तासाचे आंत गणपुर्ती साठी आवश्यक असलेल्या संख्येइतके सभासद उपस्थित न झाल्यास, सभा गणपुर्ती अभावी तहकुब करण्यात येईल. तहकुब करण्यास आलेली सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी एक तासानंतर घेण्यात येईल व अशा तहकुब सभेला गणपुर्ती आवश्यक राहणार नाही. सभेबाबतच्या प्रत्येक सुचनेमध्ये ही तरतुद नमुद केली पाहीजे.

०८.) विशेष सर्वसाधारण सभा व तिचे कार्य :

संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेशिवाय विशेष सर्वसाधारण सभा कोणत्याही वेळी बोलावता येईल. विशेष सर्वसाधारण सभेत (१) संस्थेच्या नावांत बदल करण्याबाबत, (२) संस्थेच्या उद्देशात बदल करण्या बाबत,(३) संस्थेचे पुर्णतःवा अंशतः दुसऱ्या संस्थेत विलिनीकरण करण्याबाबत, (४)संस्था विसर्जित करण्याबाबत व (५) इतर तातडीच्या व महत्वाच्या विषयाबाबत विचारविणीमय करण्यात येईल निर्णय घेता येईल. विशेष सर्वसाधारण सभेची सुचना व गणपुर्ती वरील नियम क्रमांक ७ प्रमाणे राहील.

अध्यक्ष

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social Work College, Khadki, Akola

उपाध्यक्ष

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil Social Work College,
Khadki, AKOLA

सचिव

Smt. P.D. Patil Social Work College AKOLA College Code 225

०९.) <u>संस्थेचे कार्यकारी मंडळ व पदाधिकारी यांची रचना</u> :

या संस्थेचा कारभार पाहण्यासाठी एक कार्यकारी मंडळ राहील. अशा कार्यकारी मंडळात एकुण ०७ (सात) कार्यकारी सभासद राहतील. कार्यकारी मंडळातील पदाधिकाऱ्यांची रचना खालील प्रमाणे राहील.

(१). अध्यक्ष .. .१. (२). उपाध्यक्ष ... ... १. (३). सचिव .. १

(४) कार्यकारी सभासद .. ०३ (५) कोषाध्यक्ष १

१०.) <u>कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडनुकीची पध्दत</u> :

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल ५ (पाच) वर्षाचा राहील. दर ५ (पाच) वर्षानी मंडळाच्या ७ सात कार्यकारी सभासदांची निवड नियम क्रमांक. १४ मधील तरतुदीनुसार गुप्त मतदानाने सर्वसाधारण सभेत सभासदांच्या बहुमताने करण्यात येईल. कार्यकारी मंडळावर निवडुन आलेले कार्यकारी सभासद त्यांच्या मधुन वर नियम क्रमांक ०९ मध्ये नमुद केलेल्या पदाधिकाऱ्यांची निवड बहुमताने करतील.

११.) <u>कार्यकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची कामे</u> :

अ.) <u>अध्यक्ष</u> :

अध्यक्ष हे (१) सर्वसाधारण सभेची तसेच कार्यकारी मंडळाच्या सभेची तारीख व वेळ ठरवतील व अशा सर्व सभेबाबतची सुचना स्वतःच्या सहीने काढतील, (२) सर्वसाधारण सभेचे तसेच कार्यकारी मंडळाच्या सभेचे सभाध्यक्ष म्हणुन काम पाहतील. (३) सर्व सभेच्या कामकाजावर व कार्यवाहीवर नियंत्रण ठेवतील व सभेत सुव्यवस्था राखतील. (४)कार्यकारी मंडळाच्या मान्यतेस अधीन राहुन संस्थेच्या व /किंवा त्याव्दारा संचालित उपक्रमाचा उचित व्यवस्थापनास आवश्यक असलेले कर्मचारी नियुक्त करतील. (५) सभेमध्ये कोणत्याही प्रश्नावर किंवा विषयावर समान मते पडल्यास त्या सभेच्या सभाध्यक्ष म्हणुन एक जादाचे निर्णयी मत देतील.(७) सभा व त्या अंतर्गत संचालित उपक्रम यांच्या कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवतील.

ब.) <u>उपाध्यक्ष</u> :

उपाध्यक्ष हे (१) अध्यक्ष यांच्या अनुपस्थितीमध्ये सर्व सभेचे सभाध्यक्ष म्हणुन काम पाहतील व अध्यक्ष यांची इतर कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडतील.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil
Social Work College,
Khadki, AKOLA

Smt. Panchfuladevi Patil Social Work College, Khadki, Akola

क) **सचिव :**

सचिव हे (१) अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था व त्या अंतर्गत संचालित उपक्रम यांच्या कामकाजावर देखरेख ठेवतील. (२) संस्थेच्या कामकाजाबाबत सर्व पत्रव्यवहार करतील. (३) सर्वसाधारण सभेत व/किंवा कार्यकारी मडळाच्या सभेत होणाऱ्या कामकाजाबाबतच्या व निर्णयाबाबतच्या अचुक नोंदी ठराव पुस्तकांत नोंद करून घेतील व अशा नोंदीचे पुढील सभेत वाचन करून त्यास मंजुरी मिळवतील. (४) कार्यकारी मंडळाने तसेच सर्वसाधरण सभेने मंजुर केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करतील व त्या अनुशंगाने आवश्यक कार्यवाही करतील.

ड) **कार्यकारी सभासद :**

कार्यकारी सभासद हे कार्यकारी मंडळाच्या सर्व सभेला उपस्थित राहतील व कार्यकारी मंडळाच्या कामकाजात सक्रीय भाग घेतील.

ई) कोषाध्यक्ष :- संस्थेचे आर्थिक व्यवहार पाहतील.

१२). **कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :**

अ). दर तीन महिन्यातून एकदा कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात येईल. अशा सभेस साधारण सभा असे संबोधण्यास येईल. याशिवाय कोणत्याही वेळी आवश्यकतेनुसार कार्यकारी मंडळाची अतिरिक्त सभा बोलवता येईल व अशा सभेस विशेष सभा असे संबोधण्यात येईल.

ब). कार्यकारी मंडळाच्या एकुण कार्यकारी सभासद संख्येच्या १/३ (एक तृतियांश) इतक्या कार्यकारी सभासदांनी कार्यकारी मंडळाची सभा बोलावण्याबाबत अध्यक्ष यांच्याकडे लेखी मागणी केल्यास व अशा मागणीपत्रात कार्यकारी मंडळाची सभा कोणत्या प्रयोजनासाठी

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil
Social Work College,
Khadki, AKOLA

अध्यक्ष　　　उपाध्यक्ष　　　सचिव

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social
Work College, Khadki, Akola

आवश्यक आहे याबाबत स्पष्ट तपशील दिला असल्यास, अध्यक्ष यांनी त्यांना मागणीपत्र मिळाल्याचे तारखेपासून १५ दिवसाच्या आत कार्यकारी मंडळाची सभा बोलावली पाहिजे. मागणीपत्र मिळाल्याचे तारखेपासून १५ दिवसाच्या आत अध्यक्ष यांना कार्यकारी मंडळाची सभा न बोलावल्यास, मागणीपत्रावर सहया करणाऱ्या कार्यकारी सभासदापैकी कोणत्याही कार्यकारी सभासदाच्या सहीने कार्यकारी मंडळाची सभा बोलावता येईल व मागणीपत्रात नमुद केलेल्या विषयावर विचारविनिमय करून निर्णय घेता येईल.

क). कार्यकारी मंडळाच्या सलग तीन सभेला पुर्व सुचनेशिवाय व/किंवा सबळ कारणा शिवाय अनुपस्थित राहणाऱ्या कार्यकारी सभासदाचे कार्यकारी मंडळावरील सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. याबाबतचा निर्णय कार्यकारी मंडळाच्या उरलेल्या कार्यकारी सभासदांच्या एकमताने घेणे अनिवार्य राहील. असा निर्णय घेण्यापूर्वी संबंधीत कार्यकारी सभासदास स्वतःची बाजु मांडण्याची व स्वतःचा बचाव करण्याची योग्य संधी दिली पाहिजे.

१३.) <u>कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या</u> :

अ). कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना कार्यकारी मंडळाच्या प्रत्येक कार्यकारी सभासदास सभेच्या नियोजित तारखेच्या कमीत कमी सात दिवस अगोदर मिळेल अशा बेताने अध्यक्ष यांच्या सहीने सुचना पुस्तकांतून किंवा डाक पुस्तकांतुन देण्यात येईल किंवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यात येईल.

ब). कार्यकारी मंडळाच्या सभेला कार्यकारी मंडळाच्या एकुण कार्यकारी सभासद संख्येच्या २/३ (दोन तृतियांश) इतक्या कार्यकारी सभासदांची उपस्थिती गणपुर्तीसाठी आवश्यक राहील. सभेच्या नियोजित वेळेपासून अर्ध्या तासाचे आत गणपुर्तीसाठी आवश्यक असलेल्या संख्येइतके कार्यकारी सभासद उपस्थित न झाल्यास सभा गणपुर्ती अभाव तहकुब करण्यात येईल. तहकुब करण्यात आलेली सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी एक तासानंतर घेण्यात येईल व अशा तहकुब सभेला गणपुर्ती आवश्यक राहणार नाही. ही तरतूद सभेबाबतच्या सुचनापत्रात नमुद केली पाहिजे.

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social Work College, Khadki, Akola

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil Social Work College,
Khadki, AKOLA

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

१४.) कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम :

कार्यकारी मंडळाची निवड दर पाच वर्षांनी त्या प्रयोजनासाठी आयोजित केलेल्या सर्वसाधारण सभेत गुप्त मतदान पध्दतीने सभासदांच्या बहूमताने करण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या बहूमताने सर्व साधारण सभेची तारीख व निवडणुकीबाबतचा इतर संपुर्ण कार्यक्रम निश्चित करण्यात येईल. तसेच कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीच्या संदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यासाठी एक निवडणुक अधिकारी नियुक्त करण्यात येईल व अशा निवडणुक अधिकाऱ्यास निवडणूक अधिकारी यांचे सहीने सभासदांच्या माहितीसाठी संस्थेच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावून प्रसिध्द करण्यात येईल. तसेच निवडणुक कार्यक्रमाची प्रत प्रत्येक सभासदास निवडणुक प्रकिया सुरू होण्याच्या तारखेपुर्वी कमीत कमी दहा दिवस अगोदर मिळेल अशा बेताने डाक पुस्तकांतून देण्यात येईल किंवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी आयोजित केलेल्या सर्वसाधारण सभेची तारीख व निवडणुक कार्यक्रम प्रसिध्द केल्याचा दिवस यामध्ये कमीत कमी २१ दिवसाचे अंतर आवश्यक राहील. प्रसिध्द केलेल्या कार्यकमानुसार निवडणुकीच्या संदर्भात आवश्यक कार्यवाही करणे व त्या आनुशंगाने उपस्थित होणाऱ्या बाबींवर निर्णय घेण्याची शक्ती निवडणुक अधिकारी यांस राहील.

१५.) कार्यकारी मंडळातील रिक्त जागा भरणेबाबत :

कार्यकारी मंडळातील कार्यकारी सभासदाच्या किंवा पदाधिकाऱ्यांच्या मृत्युमुळे किंवा राजिनाम्यामुळे किंवा अन्य कारणाने कार्यकारी मंडळात रिक्त होणारी जागा कार्यकारी मंडळाचया हयात असलेल्या किंवा उरलेल्या कार्यकारी सभासदांच्या बहूमताने संस्थेच्या सभासदामधून भरण्यात येईल. अशा प्रकारे निवड करण्यात आलेल्या कार्यकारी सभासदाचा किंवा पदाधिकाऱ्यांचा कार्यकाल त्यावेळी कार्यरत असलेल्या कार्यकारी मंडळाच्या उर्वरित कार्यकालापुरता मर्यादित राहील.

१६.) कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :

संस्था व त्याव्दारा संचालित उपक्रम यांच्या कारभारावर व कामकाजावर नियंत्रण ठेवणे. संस्था व त्याव्दारा संचालित उपक्रम यांच्या उचित व्यवस्थापनासाठी व कारभारासाठी आवश्यक असलेले कर्मचारी नियुक्त करणे, कर्मचा यांच्या सेवाशर्ती व वेतन इत्यादी ठरविणे. कर्मचाऱ्यास सेवेतून निलंबीत करणे किंवा बडतर्फ करणे किंवा कमी करणे कार्यकारी मंडळातील रिक्त जागा भरणे, सभासदत्वासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जावर निर्णय घेणे, आवश्यक असेल तेव्हा निवडणुक अधिकारी नियुक्त करणे व हिशोबाचे परिक्षण करण्यासाठी सक्षम लेखापरिक्षक नियुक्त करणे ही कार्यकारी मंडळाची कर्तव्ये व अधिकार राहतील.

अध्यक्ष

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social
Work College, Khadki, Akola

उपाध्यक्ष

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil
Social Work College,
Khadki, AKOLA

सचिव

Smt. P.D. Patil Social Work College Khadki Akola College Code 225

१७.) हिशोबाचे वर्ष :

या संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च राहील. संस्था व त्याव्दारा संचालित उपक्रम यांचे हिशोब प्रत्येक वर्षी मार्च महिन्याचे ३१ तारखेस संतुलित करण्यात येईल.

१८.) संस्थेचा निधी, मिळकत व विनियोग :

संस्था व त्याव्दारा संचालित उपक्रम यांस सर्व मार्गाने मिळणारे उत्पन्न व अन्य प्रॉपर्टी यांस संस्थेचा निधी समजण्यात येईल. संस्था व त्याव्दारा संचालित उपक्रम यांना संपादन केलेली किंवा त्यासमिळालेली सर्व जंगम व स्थावर मालमत्ता ही संस्थेची मिळकत समजण्यात येईल. संस्थेच्या निधीचा व मिळकतीचा विनियोग संस्थेच्या प्रयोजनावर व उद्देशावर करण्यात येईल. व त्याबाबत सर्व निर्णय घेण्याचे अधिकार संस्थेचा अध्यक्ष व सचिव यांना राहतील.

१९.) उद्दीष्ट निहाय खर्चाची तरतुद :

संस्थेव्दारा संचालित उपक्रमास मिळणाऱ्या उत्पन्नाचा व अन्य प्राप्तीचा विनियोग त्याच उपक्रमावरकरण्यात येईल. याशिवाय विशिष्ट उद्देशाच्या पुर्तीसाठी मिळणा या रकमेचा विनियोग त्याच उद्देशावर करण्यात येईल. संस्थेला मिळणाऱ्या इतर सर्वसाधारण उत्पन्नातून उद्देश निहीय खर्च खालील प्रमाणे करण्यात येईल.

अ. शिक्षण व सामाजिक उद्देशावर.. .. .. .. ५० टक्के

ब. उर्वरित उद्देशावर .. .. ... ५० टक्के

२०.) कर्ज किंवा ठेवी घेण्याबाबत तरतुद :

मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० या अधिनियमाच्या कलम ३६ अे(३) मधील तरतुदीनुसार धर्मादाय सह आयुक्त अमरावतीयांची पुर्व मंजुरी मिळवून व अशा मंजुरी आदेशात लादण्यात येतील अशा अटी व शर्ती यांस अधिन राहून संस्थेच्या प्रयोजनासाठी किंवा संस्थेच्या वतीने कर्ज घेण्याचा किंवा उसनवार रक्कमा घेण्याचा किंवा ठेव स्विकारण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

२१.) स्थावर मालमत्तेची खरेदी / विक्री करणे बाबत तरतुद :

अ.)संस्थेच्या उददेशाच्या पुर्तीसाठी किंवा त्या अनुशंगाने आवश्यक नसलेली व निव्वळ संस्थेस उत्पन्न मिळविण्याचे हेतुने स्थावर मालमत्ता खरेदी करण्यासाठी संस्थेच्या निधीची गुंतवणुक करण्यापुर्वी धर्मादाय सह आयुक्त अमरावती यांची मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० चे कलम ३५ प्रमाणे परवानगी घेणे अनिवार्य राहील. परंतु संस्थेच्या उद्देशाच्या पुर्तीसाठी किंवा त्या आनुशंगाने आवश्यक असलेली स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचा अधिकार अध्यक्ष व सचिव यांना राहील.

अध्यक्ष

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social
Work College, Khadki, Akola

उपाध्यक्ष

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil
Social Work College,
Khadki, AKOLA

सचिव

ब.) मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० चे कलम ३६ नुसार धर्मादाय सह आयुक्त अमरावती यांची पुर्व परवानगी मिळवून व अशा परवानगी आदेशात लादण्यात येतील अशा अटी व शर्ती यांस अधिन राहून संस्थेची कोणतीही स्थावर मालमत्ता विक्री करण्याची किंवा ती अदला बदल करण्या चा किंवा ती बक्षीस म्हणून देण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

२२.) **सभासदांची यादी ठेवण्याबाबत :**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १५ आणि संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ मधील नियम १५ प्रमाणे अनुसूची सहा या विहित नमुन्यातील सभासद नोंदणी पुस्तकांत संस्थेच्या सभासदांची यादी ठेवण्यात येईल.

२३.) **बँक खाते :**

संस्थेचा निधी व पैसा मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० चे कलम ३५ प्रमाणे गुंतविण्यात येईल. संस्थेच्या पैसा संस्थेच्या प्रयोजनासाठी तात्काळ किंवा निकटवर्ती तारखेस लागत नसल्यास तो पैसा कोणत्याही अनुसूचित बँकेत किंवा डाकबचत बँकेत किंवा राज्य शासनाने मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० चे कलम ३५ च्या प्रयोजनासाठी मान्यता दिलेल्या सहकारी बँकेत संस्थेच्या नांवाने ठेवण्यात येईल. बँकेतील पैसा काढण्याचा व्यवहार अध्यक्ष व सचिव अशा दोन पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त सहीने करण्यात येईल.

२४.) **नियम व नियमावलीत बदल करण्याची तरतुद :**

संस्थेच्या एकुण सभासद संख्येच्या २/३ (दोन तृतियांश) इतक्या सभासदांनी मान्यता दिल्यास कोणत्याही वेळी या नियम व नियमावलीतील तरतुदीमध्ये बदल करता येईल किंवा त्यातील तरतुद रद्द करता येईल किंवा त्यात नविन नियमाची भर घालता येईल.

२५.) **संस्थेच्या नांवात व उद्देशात बदल करणे बाबत :**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० कलम १२ आणि १२ अे मधील तरतुदींना अधिन राहून विशेष सर्वसाधारण सभेत संस्थेच्या एकुण सभासद संख्येच्या ३/५ (तीन पंचमांश) इतक्या सभासदांच्या संमतीने या संस्थेच्या नांवात व उद्देशात बदल करता येईल किंवा या संस्थेचे दुसऱ्या संस्थेत पुर्णतः वा अंशतः विलिनीकरण करता येईल.

अध्यक्ष

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social
Work College, Khadki, Akola

उपाध्यक्ष

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil
Social Work College,
Khadki, AKOLA

सचिव

२६.) **संस्था विसर्जित करण्याबाबत :**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १३ व १४ मधील तरतुदींना अधिन राहून विशेष सर्व साधारण सभेत संस्थेत संस्थेच्या एकुण सभासद संख्येच्या ३/५ (तीन पंचमांश) इतक्या सभासदांच्या समंतीने ही संस्था विसर्जित करता येईल.

२७.) **कार्यकारी मंडळातील सभासदांची महिती कळविणे :**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम ४ आणि संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ मधील नियम ७ प्रमाणे संस्थेच्या कार्यकारी मंडळातील सभसदाबाबतची माहिती अनुसूची एक या विहित नमुन्यात प्रत्येक वर्षी सहाय्यक संस्था निबंधक, अकोला विभाग, अकोला यांच्या कार्यालयात दाखल करण्यात येईल.

२८.) **संस्थेच्या कर्मचाऱ्यांबाबत माहीती कळविणे बाबत :**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम ४ अे आणि संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ मधील नियम ८ प्रमाणे संस्थेने नियुक्त केलेल्या कर्मचा यांबाबतची माहीती अनुसूची दोन या विहीत नमुन्यात प्रत्येक वर्षी सहाय्यक संस्था निबंधक, अकोला विभाग, अकोला यांच्या कार्यालयात दाखल करण्यात येईल.

## दाखला

प्रमाणित करण्यात येते की ही प्रत **श्रीमती पंचफुलादेवी पाटिल समाजकार्य महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ,खडकी,ता.जि.अकोला.** या संस्थेच्या नियम व नियमावलीची सत्य प्रत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | प्रा.डॉ. संकेत सुरेशराव काळे | अध्यक्ष. | (signature) |
| ०२. | प्रा.डॉ. प्रफुल विनायकराव पवार | उपाध्यक्ष | (signature) |
| ०३. | प्रा.डॉ. केशव सिताराम गोरे | सचिव | (signature) |

स्थळ : अकोला.

दिनांक : १०/०४/२०२१

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social
Work College, Khadki, Akola

Smt. P.D. Patil Social Work College, Khadki, AKOLA College Code 225

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग, अकोला — 07 June 2023

Made by-
Read by-
Treat by-
07/06/2023